# ‘स्व’-रूपवर्धिनी स्पर्धा परीक्षा केंद्र
## माहितीपत्रक

## ‘ विकसित व्हावे अर्पित होऊनी जावे ’

समाजाच्या सर्व स्तरातील गुणवत्तेचा शोध घेऊन तिच्या विकासासाठी सुयोग्य वातावरण व संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न ‘स्व’-रूपवर्धिनी गेली ४२ वर्षे करीत आहे. सामाजिक जाणिवेचे नेतृत्व तयार करणे हा संस्थेच्या कामाचा गाभा आहे. या व्यक्तिमत्व विकासाच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून संस्थेच्या वाढीच्या विशिष्ट टप्प्यावर ‘स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र’ सुरु करण्यात आले.

‘स्व’-रूपवर्धिनी काम करीत असलेल्या पुणे शहराच्या पूर्व भागात सुसज्ज संदर्भ ग्रंथालय, प्रशस्त अभ्यासिका व सुयोग्य मार्गदर्शनाची सोय असलेल्या अशा केंद्राची आवश्यकता होती. ही गरज लक्षात घेऊन सन २००० मध्ये वरील केंद्र सुरु करण्यात आले. (आजपर्यंत केंद्रातून मार्गदर्शन घेतलेले ३०० हून अधिक विद्यार्थी प्रशासनात विविध स्तरांवर अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.)

उत्तम नेतृत्वगुण व सचोटी असणारे अनेक तरुण, तरुणी समाजात आहेत, ज्यांची प्रशासनाला गरज आहे. परंतु आर्थिक व अन्य समस्यांमुळे ही मुले पुढे येऊ शकत नाहीत व त्यांना सुयोग्य मार्गदर्शन मिळत नाही. या समस्येवरील एक उपाय म्हणून ‘स्व’-रूपवर्धिनीने २०२१-२०२२ या वर्षासाठी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत राज्यसेवा(MPSC) मार्गदर्शन वर्गाचे आयोजन केले आहे. या योजनेचे हे १० वे वर्ष आहे. या योजनेद्वारे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्थेची प्रवेश परीक्षा व मुलाखत द्यावी लागेल. त्यातून अंतिम निवड झालेल्या ५० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल.

**‘विकसित व्हावे ! अर्पित होऊनी जावे !!’** या सूत्राप्रमाणे स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून सामाजिक जाणीव असणारे उत्तम प्रशासक तयार करणे हे केंद्राचे उद्दिष्ट आहे. विविध पातळ्यांवरील स्पर्धा परीक्षांची तयारी हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाचे एक उत्तम माध्यम ठरू शकते. त्यामुळेच विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा कस लागेल आणि त्यांच्या गुणवत्तेचा विकास होईल.

स्पर्धा परीक्षा केंद्राच्या कामात तज्ज्ञ व्यक्तींसोबत विद्यार्थ्यांचाही सहभाग असतो. **“विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी चालवलेला उपक्रम”** असे केंद्राचे स्वरूप आहे. यामुळे अभ्यास करता करता विद्यार्थ्यांच्या नेतृत्व गुणांचा व सामाजिक जाणिवांचा विकास होतो. अशा रीतीने चारित्र्यवान व समाजाभिमुख अधिकाऱ्यांची फळी केंद्राच्या माध्यमातून निर्माण होत आहे.

**२०१९ मध्ये MPSC मार्फत घेण्यात आलेल्या वर्ग - अ व वर्ग - ब तसेच इतर अराजपत्रित परीक्षांमध्ये आमच्या ५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची अधिकारी पदासाठी निवड झाली.**

# ‘स्व’-रूपवर्धिनी

## स्पर्धा परीक्षा केंद्र

### २०१८-१९ मधील यशस्वी विद्यार्थी

१) किरण चव्हाण ( IPS-2017, AIR618-2018)
२)विकास पालवे (ASST.COMMANDANT)
३) आशिष बारकुल ( DC)
४) राम मुळे ( DC)
५) दीक्षांत देशपांडे ( TAH )
६) मयूर भुजबळ ( Dy.SP )
७) केशव पवार (Dy.CEO )
८) डॉ. राजीव बाबळे ( ACST )
९) शिवराज डोंगरे (DO)
१०) अमर मोहिते ( Dy.EO)
११) आकाश दरेकर( Dy.EO)
१२) प्राची कर्णे ( तहसीलदार )
१३) कावेरी कदम (ASO, करनिर्धारण अधिकारी नगरपरिषद)
१४) येमाजी धुमाळ (ASO, करनिर्धारण अधिकारी नगरपरिषद)
१५) राहुल सावंत (ASO, करनिर्धारण अधिकारी नगरपरिषद)
१६)जान्हवी जानकर (ASO, राज्यात मुलींमध्ये द्वितीय)
१७) शुभम घुगे (ASO, Exi.SI)
१८) भाग्येश जावळे (ASO, ग्रामविकास कार्यकारी अधिकारी )
१९) प्रेमकुमार दांडेकर (PSI)
२०) अमोल जगदाळे (PSI)
२१) हेमंत पाटील (PSI)
२२) विजय डाखोरे (PSI)
२३) राहुल महाजन (PSI)
२४) नरेश निंबाळकर (PSI)
२५) अंकुश चिखले (PSI)
२६) गोकुळ महानवर (PSI)
२७) विशाल देवरे (PSI)
२८) सागर गायकवाड (PSI)
२९) सुशांत दुड्डे (PSI)
३०) सुधीर पिलाने (PSI)
३१) रणजीत चव्हाण (PSI)
३२) हर्शल राऊत (PSI)
३३) अक्षय भरते (Exs.SI)
३४) अनिकेत मोरे ( PO RRB)
३५) किरण खोत ( PO RRB, PO Bank of India)
३६) श्रीराम रायते ( ग्रामविकास कार्यकारी अधिकारी)
३७) प्रतिमा पासलकर (महाराष्ट्र नगरपरिषद लेखा व वित्तसेवा अधिकारी)
३८) पंकज सरोदे (महाराष्ट्र नगरपरिषद लेखा व वित्तसेवा अधिकारी)
३९) योगेश कुंदनगार (महाराष्ट्र नगरपरिषद लेखा व वित्तसेवा अधिकारी)
४०) गणेश रणदिवे (महाराष्ट्र नगरपरिषद लेखा व वित्तसेवा अधिकारी)
४१) रोहित जाधव (महाराष्ट्र नगरपरिषद कर निर्धारण अधिकारी)
४२) कुलदीप भोलाणे (महाराष्ट्र नगरपरिषद कर निर्धारण अधिकारी)
४३) कपिल भापकर (महाराष्ट्र नगरपरिषद कर निर्धारण अधिकारी)
४४) महेंद्र साळुंके (कनिष्ठ लिपिक जिल्हा न्यायालय,पुणे )
४५) अमीर तांबोळी (कनिष्ठ लिपिक जिल्हा न्यायालय पुणे)
४६) राहुल वळवी (महाजनको ज्युनिअर इंजिनिअर)
४७) धवलराज पवार (जिल्हा मध्यवर्ती बँक क्लार्क)
४८) डॉ. शाम पवार ( सहायक गुप्तचर अधिकारी )

# ‘स्व’-रूपवर्धिनी

## स्पर्धा परीक्षा केंद्र

### २०१९-२० मधील यशस्वी विद्यार्थी

1. प्रदीप शेंडगे -गटविकास अधिकारी, वर्ग अ
2. कावेरी कदम - कक्ष अधिकारी, वर्ग ब
3. शुभम घुगे- कक्ष अधिकारी, वर्ग ब
4. गणेश मंडलिक -भूमी अभिलेखा उपनिबंधक, वर्ग ब
5. अभिजित हजारे- नायब तहसीलदार, वर्ग
6. अविनाश घोरपडे -PSI
7. सुप्रिया जगताप- PSI
8. वर्षाराणी सुतार- PSI
9. संतोष देशमुख -PSI
10. महेश अंजनवाड- PSI
11. सुभाष बोराटे -Tax Asst.
12. योगेश काटे- मंत्रालय लिपिक
13. संदीप मोरे - मंत्रालय लिपिक
14. निहाल रामटेके - मंत्रालय लिपिक
15. रविशंकर चव्हाण- मंत्रालय लिपिक
16. वैजनाथ साळवे- मंत्रालय लिपिक
17. संघर्ष मेश्राम- १. मंत्रालय लिपिक २. पोलीस उपनिरीक्षक राज्यउत्पादन शुल्क
18. अश्विनी येळे- तलाठी
19. समीर येनपुरे – तलाठी
20. संदीप गोसावी- तलाठी
21. स्वप्नील कांबळे – रेल्वे अभियांत्रिकी विभाग

# तज्ज्ञ शिक्षक वृंद

| शिक्षकांचे नाव | | विषय |
|---|---|---|
| १) श्री. हिरालाल डोईफोडे | - | भूगोल |
| २) श्री. गजानन भस्के | - | अर्थशास्त्र |
| ३) श्री. रामदास मिरकर | - | राज्यशास्त्र |
| ९) श्री.सागर फुलारी | - | इतिहास |
| ४) श्री. अभिजित मडकर | - | विज्ञान आणि तंत्रज्ञान |
| ५) श्री. दिलीप हिंगे | - | सामान्य विज्ञान |
| ६) श्री.अभिजित खाडे | - | पर्यावरण |
| ७) श्री. दिलीप मुसळे | - | इंग्रजी |
| ८) श्री. विशाल सुतार | - | मराठी |
| ९) श्री.सुशील बारी | - | चालू घडामोडी |
| १०) श्री.रुपेश जाधव | - | HR & HRD |
| ११) श्री.सागर काटदरे | - | CSAT |

## अधिकारी मार्गदर्शक

| | |
|---|---|
| १) श्री.अमोल पवार (IRS) | २) श्री.किरण चव्हाण (IPS) |
| ३) श्री.विजय गोते (ACST) | ४) सौ.सारिका गोते (ACST) |
| ५) श्री.स्वप्नील जाधव (ACP) | ६) श्री.प्रणील गिल्डा (ACP) |
| ७) कु.आश्विनी शेंडगे (ACP) | ८) कु.प्रिया देहेडकर (TAH.) |
| ९) श्री.अमोल भालके (समाजकल्याण अधिक्षक) | १०) श्री.विश्वजित गुंड (N.TAH.) |
| ११) श्री.अभिजित हजारे (ABDO) | १२) श्री. संतोष मोरे ( CO) |

# ‘स्व’-रूपवर्धिनी स्पर्धा परीक्षा केंद्र

## (राज्य लोकसेवा आयोग पूर्व व मुख्य परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रम रचना)

‘स्व’-रुपवर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्रामार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे सन २०२२ मध्ये होणाऱ्या राज्यसेवा परीक्षेसाठी महाराष्ट्रातील गुणवंत,विशेषतः गरजू व ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना आहे. या योजनेअतर्गत लेखी परीक्षा व मुलाखतीद्वारा निवड झालेल्या विद्यार्थ्यांना राज्यसेवा २०२१-२२ परीक्षेसाठी संपूर्ण विनामूल्य मार्गदर्शन, अभ्यासिका व ग्रंथालय उपलब्ध करून देण्यात येत आहे.

शिष्यवृत्ती योजनेची प्रशिक्षण कार्यक्रम रचना पुढील प्रमाणे :-

१) **विषय अध्यापन** : पूर्व परीक्षा पेपर १, २ व मुख्य परीक्षेच्या मराठी, इंग्रजी, सामान्य अध्ययन I, II, III, व IV या विषयांचे संपूर्ण परीक्षाभिमुख मार्गदर्शन.

२) **परीक्षा** :- शिकवून झालेल्या अभ्यासक्रमावर आधारित नियमित टप्प्याने सराव चाचण्या होतील.तसेच आयोगाच्या पूर्व व मुख्य परीक्षेच्या आधी, संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित सराव परीक्षा (TEST SERIES) घेण्यात येतील.या सर्व परीक्षांसाठी पूर्वतयारी करणे अनिवार्य असेल.

३) **गट चर्चा व विद्यार्थ्यांची व्याख्याने** :- विद्यार्थ्यांनी नियमितपणे गटामध्ये अभ्यास करण्यावर मुख्यत: भर असेल.राष्ट्रीय, जागतिक घटनांवर गटचर्चेच्या माध्यमातून विचारांची देवाण- घेवाण करण्याकरिता जागा उपलब्ध करून दिली जाईल.

४) **अधिकारी भेटी** :- राज्यसेवा परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रशासकीय सेवेत असलेल्या विविध अधिकाऱ्यांबरोबर अनुभवांची देवाण - घेवाण होईल,असे प्रेरणात्मक कार्यक्रम आयोजित केले जातील.

५) **विनामूल्य अभ्यासिका** :- निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना दररोज सकाळी ६.०० ते रात्री १२.०० वा.पर्यंत अभ्यासिका विनामूल्य उपलब्ध असेल.

६) **विनामूल्य ग्रंथालय** :- केंद्रामध्ये सुसज्ज असे ग्रंथालय आहे. स्पर्धा परीक्षांना उपयुक्त अशी सर्व विषयांची पुस्तके, संदर्भ ग्रंथ, पाठ्यपुस्तके, गाईड्स, प्रश्नसंच तसेच विविध प्रकारची वर्तमानपत्रे, नियतकालिके उपलब्ध असतील. ग्रंथालयाची वेळ :- सोम. ते शनि. सकाळी १०.३० ते सायं. ४.३० वा.

७) **अनामत रक्कम (Deposite)** :- शिष्यवृत्ती बॅचसाठी निवड झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यास रु.१०००/- अनामत रक्कम भरावी लागेल. कालावधी पूर्ण झाल्यानंतर ही रक्कम परत केली जाईल.

८) **कालावधी** :- शिष्यवृत्ती बॅचचा कालावधी साधारण १० ते १२ महिने राहील.

e-mail Id : swaroopwardhinee.cec@gmail.com Facebook Id : Swa RoopwardhineeCec
telegram: t.me/ swaroopwardhineecec

# ‘स्व’-रूपवर्धिनी स्पर्धा परीक्षा केंद्र

## प्रवेश परीक्षेसंबंधी महत्वाची माहिती

१) विद्यार्थ्याने अर्ज अचूक व पूर्ण भरावा.
२) परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची मुलाखत घेतली जाईल व त्यानंतर अंतिम निवड करण्यात येईल. संस्थेचा निर्णय अंतिम राहील.
३) शिष्यवृत्ती योजने संदर्भात कोणतेही बदल अथवा फेरफार करण्याचे संपूर्ण हक्क संस्थेच्या अधिन असतील.
४) **प्रवेश परीक्षेबाबत** :-
**प्रवेश परीक्षेचे स्वरूप** - सदर परीक्षा राज्यसेवा पूर्व परीक्षेच्या अभ्यासक्रमावर आधारित वस्तुनिष्ठ स्वरुपाची राहील. वस्तुनिष्ठ **१०० प्रश्न** (GS- ६०, CSAT-४०) **गुण** - **२००, (1/4 Negative marking)**
**५) प्रवेश अर्ज व परीक्षा शुल्क**
अ) परीक्षेसाठीचे अर्ज http://www.swaroopwardhinee.org या संकेतस्थळावर https://forms.gle/aeZ3BWDjKL3ERvtU9 या link वर उपलब्ध आहेत.

ब) **प्रवेश परीक्षा शुल्क रु - ५०/-** हे परीक्षेच्या वेळी स्विकारले जाईल.

क) **प्रवेश परीक्षा** :- रविवार, दिनांक ३० मे २०२१
**परीक्षेची वेळ ,परीक्षा केंद्र ,प्रवेश पत्र इ. ई मेल अथवा whatsapp द्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.**

६) **प्रवेश परीक्षेसाठी आवश्यक अर्हता** -
१) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापिठाचा **पदवीधर.** (अंतिम वर्षाची परीक्षा दिली असणारे विद्यार्थी देखील पात्र ठरतील)
२) महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
३) वयोमर्यादा - वय वर्षे ३० पर्यंत.

७) **अर्जासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे** -
१) अर्जदाराचे पासपोर्ट आकाराचा फोटो.
२) पदवी प्रमाणपत्राची एक झेरॉक्स प्रत
३) ओळखपत्राची झेरॉक्स प्रत ( फोटो आय डी )

८) मुलाखतीस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची यादी,मुलाखतीचे वेळापत्रक व अंतिम निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी संस्थेच्या सूचना फलकावर व वेबसाईटवर प्रसिद्ध केली जाईल.